**: चौकशी अर्ज नं.1/2014 मधील नि.1 वरील आदेश :**

1. अर्ज वाचला. अर्जदाराने हा अर्ज वाटपाच्या दाव्यातील दरखास्तीनुसार योग्य वाटप होत नाही व ताबा दिला असे असतांना इतर लोक मिळकतीतुन उत्पन्न घेत आहेत त्यानुसार योग्य ती चौकशी करण्यात यावी म्हणून अर्ज दिला.

2. सदरील अर्ज हा मा.जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या आदेशान्वये चौकशी अर्ज म्हणून दाखल करुन घेण्यात आला.

3. सदरील अर्ज हा दरखास्त रे.द.नं.11/2000 कामी असल्यामुळे रे.द.नं.11/2000 चे सर्व कागदपत्र मागविण्यात आली.

4. रे.द.नं.11/2000 मधील सर्व पक्षकारांना नोटीसा काढण्यात आल्या पैकी चंद्रकला म्हातारबा पवार, सावकार रभा तसेच ललन रभा, जमादार रभा, आनंदा बाबुराव हे पक्षकार हजर झाले. परंतु त्यांनी अर्जदाराच्या अर्जाला म्हणणे दाखल केले नाही.

5. अर्जदाराच्या अर्जाला बाकीच्या पक्षकारांनी नोटीसा मिळुनसुध्दा हजर राहुन म्हणणे दिले नाही म्हणून त्यांच्याविरुध्द हा अर्ज एकतर्फा चालला.

6. अर्जदारातर्फे असे कथन करण्यात आले की, गाव मौजे कातळवेढे गट नं.55/56 मध्ये अर्जदाराचा अर्धा हिस्सा आहे व रभा व बाबू यांचा अर्धा हिस्सा आहे. दावा मिळकतीबाबत जे काही दावे झाले त्यामध्ये सर्व निकाल अर्जदाराच्या बाजुने आहे. तरी तहसीलदार व भूमी अभिलेख यांनी त्यांच्यावर अन्याय केलेला आहे. दुसरे असे की, बेकायदेशीर खरेदीदार जमीनीमध्ये येतात त्यांना मनाई करावी. तसेच म्हातारबा पवार याने जबरदस्तीने पिक काढून नेलेले आहे. अर्जदाराचे वय 88 आहे व त्याचे खुप नुकसान झालेले आहे. या सर्वाचा विचार करुन न्याय देण्यात यावा. जिल्हा न्यायालय उपविभागीय अधिकारी, आमदार, अण्णा हजारे, तहसिलदार पारनेर,

जिल्हाधिकारी अहमदनगर, भूमी अभिलेख अहमदनगर या सर्वांना अर्जदाराने आत्मदहनाचा इशारा दिलेला आहे. तरी न्याय देण्यात यावा अन्यथा पारनेर न्यायालयात आत्मदहन करणार आहे व दाव्याची फाईल लोकमत पेपरला जाहीर करणार आहे. तरी चौकशी करुन न्याय देण्यात यावा.

7. अर्जदाराचे दरखास्तीमधील मा.वकिल श्री.बी.एस्.झावरे यांना बोलाविण्यात आले. त्यांनी आपल्या युक्तीवादात सांगितले की वाटप काम करतांना नक्की ताबा कुठे आहे याच्या हद्दी खुणा दाखवून ताबा दिलेला नाही. तर तो ताबा कसा आहे एवढेच अर्जदाराला दाखविण्यात यावे.

8. या अर्जाकामी जे पक्षकार हजर झाले त्यांच्यातर्फे मा.वकिल श्री. गांधी यांनी वाटप काम झाल्याप्रमाणे पुन्हा ताबे दाखवावे व त्याच्या हद्दी व खुणा दाखवायला काही हरकत नाही असे सांगितले.

9. सर्व कागदपत्रांची छाननी करता मुळ दावा 86/1975 (रे.सि.अ. नं.93/89) याचा निकाल झाला. त्या निकालाच्याविरुध्द जिल्हा न्यायालयात अपिल करण्यात आले. अपिलात झालेला आदेश व हुकुमनामा व त्यानुसार मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेले दुसरे अपिल क्र.258/98 याचा निकाल यावरुन रे.द.नं.11/2000 व दरखास्त नं.25/2008 या कामी एकत्रीत आदेश होवून वाटप करण्यासाठी जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्याकडे प्रकरण पाठविण्यात आले. त्यानुसार तहसिलदार पारनेर यांनी मिळकतींचे ताबे वाटपकाम करुन दिल्याबाबत अहवाल सादर करण्यात आलेला आहे. हा अहवाल दि.26.2.2014 रोजी न्यायालयात हजर करण्यात आलेला आहे. या सर्व कागदपत्रांची पाहणी करता उपअधिक्षक भूमी अभिलेख पारनेर यांच्यामार्फत मोजणी होवून रे.अ.नं.93/89 मधील आदेशानुसार वाटप पूर्ण करण्यात आले.

10. या अर्जामध्ये अर्जदाराचे म्हणणे असे की त्याचा निम्मा हिस्सा आहे हे आता स्विकारता येणार नाही कारण रे.अ.नं.93/89 मधील मा.जिल्हा न्यायालय यांच्या आदेशानुसार जे हिस्से ठरले ते अंतिम झालेले आहेत. दुसरे असे की, जर अर्जदाराचा ताबा असतांना कोणी जबरदस्तीने घुसुन ताबा घेवून

पिके घेत असल्यास अर्जदाराने दुसरा दावा करणे आवश्यकत आहे. परंतु तसा पुरावा अर्जदाराने आणलेला नाही. एक लक्षात येते की जे काही वाटप काम झालेले आहे त्यानुसार अर्जदाराला पुन्हा ताबा त्याच्या हद्दी खुणानुसार दाखविण्यासाठी समोरच्यांनीसुध्दा हरकत घेतलेली नाही. तसेच जर हुकुमनाम्याप्रमाणे वाटप झालेले नाही अशी अर्जदाराची हरकत असेल तर त्यानुसार अर्जदाराने तहसिलदारांनी जे वाटप काम केले त्याविरुध्द प्रांत अधिकारी यांच्याकडे दाद मागावी. हे न्यायालय आता एवढेच पाहु शकते की हुकुनाम्याप्रमाणे वाटप झाले आहे किंवा नाही. परंतु त्या हुकुमनाम्याच्याबाहेर जावून हे न्यायालय काहीही करु शकत नाही. कारण अर्जदाराच्या हरकती या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येत नाहीत. सबब अर्जातील कथनानुसार व झालेल्या युक्तीवादानुसार मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**: आदेश :**

(1) तहसिलदार पारनेर यांनी रे.द.नं.11/2000 आणि 25/2008 मधील हुकुमनाम्यानुसार वाटप झाले आहे किंवा नाही हे पाहुन कोणाची काही हरकत असल्यास त्यावरती सुनावणी घेवून त्या हरकतींचा निपटारा करावा.

(2) तहसिलदार पारनेर यांनी आपल्यातर्फे प्रतिनिधी नेमुण सर्व संबंधितांना कब्जा कसा आहे याच्या हद्दी खुणा पुन्हा सर्व पक्षकारांना दाखवाव्यात.

(3) सदरील आदेशाची यादी तहसिलदार पारनेर यांना पाठविण्यात यावी.

(4) सदरचा अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

(र.श्री.जांबोटकर)
दि.17/4/2015 दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पारनेर.